कृतिसंशोधनाचा नवा दृष्टिकोन

- श्री.विजयकुमार पाईकराव, नाशिक, संपर्क - ९४०३७७४५२९

शैक्षणिक संशोधनाचा व्यवहार्य भाग म्हणजे कृतिसंशोधन होय. यामध्ये आपण स्वत:च्या प्रश्नाचे, समस्येचे रडगाणे न गाता, स्वत:च त्यांची सोडवणूक करण्याचा शास्त्रीय प्रयत्न करणे होय. यामध्ये आपण करीत असलेला दैनंदिन व्यवहार किंवा कार्यपद्धती, त्या व्यवहाराचे व कार्यपद्धतीचे सर्व बाजूंनी केलेले आकलन आणि ज्या परिस्थितीत ही कार्यपद्धती अवलंबिली ती परिस्थिती; ह्यात परिवर्तन घडविण्यासाठी केलेली कृती होय. कृतिसंशोधन हे विशिष्ट परिस्थितीत आणि कार्यपद्धतीत सहभागी होण्याऱ्या व्यक्तीनेच करावे असे अपेक्षित आहे. कृतिसंशोधन ही एक निरंतर चालणारी चक्रीय प्रक्रिया असून आपल्या समस्या व प्रश्न सोडविण्यात आपण यशस्वी झालो की नाही ? यशस्वी झालो असल्यास का झालो किंवा का अपयशी झालो ? आणि सुधारणेसाठी आणखी मला काय काय करता येईल यासाठी विमर्शकारी चिंतन सतत चालू ठेवलेले असते. याची सुरुवात डॉ.कुर्ट लेविन ह्यांनी सामाजिक परिस्थिती बदलासाठी प्रत्यक्ष कृतीचा आग्रह म्हणून केली होती.

तथापि नंतरच्या काळात कृतिसंशोधनावर वैज्ञानिक पद्धतीचा प्रभाव वाढत गेला व मूळ कल्पनेला छेद दिला गेला. अलीकडे कृतिसंशोधनाचा नवीन स्वरूपात पुनर्विचार झालेला आहे. म्हणून प्रचलित कृतिसंशोधन पद्धतीत मूलगामी बदल झालेला आहे. तो कृतिसंशोधकांना माहीत व्हावा यासाठी हे दिशादर्शन होय. खरे तर ''आचाराविन विचार वाया बोध हा बुद्धाचा तू जाण'' या गीतातील तथागताच्या तत्त्वाप्रमाणे कृतिसंशोधनात आचार म्हणजे कृती (Action) अभिप्रेत आहे.

१)कृतिसंशोधनातील नवा बदल - कृती संशोधनातील नवा बदल हा विमर्शशील विचार (Reflective thinking) आणि चिकित्सक दृष्टिकोनावर आधारलेला आहे. वैज्ञानिक पद्धतीवर हा दृष्टिकोन आता आधारलेला नाही. ''जुन्या अनुभवातील परस्परसंबंध म्हणजे विमर्शी विचार'' असे थोडक्यात म्हणता येईल.

स्वत:तील, अनुभवांतील उणिवांचा शोध घेऊन, त्या उणिवा व आपल्यासमोरील समस्या सोडविण्यासाठीचा चिंतनपर विचार विमर्शणामुळेच होतो. या बाऊड के व वॉकर यांच्या मते विमर्श ही एक महत्त्वपूर्ण अशी मानवी कृती आहे. ह्या कृतीत व्यक्ती पूर्वानुभवावर काळजीपूर्वक व सूक्ष्मपणे विचार करते. त्याचे मूल्यमापन करते. ह्यात वर्तन, कल्पना व भावाबरोबरच घनात्मक भावांचे उपयोजन व ऋणात्मक भावांना कमी केले जाते. नवीन अनुभवांच्या सम्यक व यथार्थ दर्शनातून वर्तन बदलासाठी उत्सुक व बांधील असतो. त्याचबरोबर प्रचलित कार्यपद्धतीची चिकित्सा आणि परिवर्तन हे त्यात सहभागी होणाऱ्या व्यक्तीने घडवून आणावे हेही अपेक्षित असते. या स्वरूपातील बदल पुढीलप्रमाणे आहे. **१.१)** कृतिसंशोधनात कृती आवश्यक आहे. जर कृती नसेल तर ते कृतिसंशोधन होणार नाही. यात कृतीला मध्यवर्ती स्थान आहे. कृतीला मुख्य प्राधान्य न देणारे विषय अध्ययनार्थी संशोधकांनी निवडल्यास ते कृतिसंशोधनात बसूच शकत नाहीत. उदा. ''इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांच्या वर्गातील अभ्यास सवयींचा शोध'' ह्या समस्या विधानात उपाययोजनेचा समावेश नाही त्यामुळे कृतिसंशोधनासाठी विषय निवडताना त्या कृतीला

मध्यवर्ती स्थान द्यावे. उदा. ''इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयींचा शोध घेऊन त्रुटी दूर करण्यासाठी उपाययोजना करणे.''

१.२) कृतिसंशोधनात सहभागी होणारी व्यक्ती हीच संशोधक असते. ज्यामुळे अहवाल लेखनात ''मी'' हा शब्द प्रमुख केंद्रबिंदू असतो. हा ''मी'' कृतिसंशोधनाच्या प्रारंभापासून अंतिम टप्प्यापर्यंत म्हणजे अहवाल लेखनापर्यंत मध्यवर्ती भूमिका बजावतो. त्यामुळे ''मी'' चा उल्लेख आराखड्यापासून अहवालापर्यंत सातत्याने केला जाणे अपेक्षित आहे. बरेच अध्ययनार्थी नोकरी करतात अधिकारी म्हणून, अन् कृतिसंशोधन समस्या घेतात प्राथमिक शाळेतील ते टाळावे.

१.३) कृतिसंशोधन एकाच व्यक्तीने करावे अशी अपेक्षा नाही. किंबहुना ते गटाने सहकार्याने कृतीत आणावयाचे आहे. शालेय स्तरावर मी आणि माझे विद्यार्थी, मी आणि माझे सहकारी, मी आणि माझ्या विद्यार्थ्यांचे पालक, मी आणि माझी शाळा व इतर शाळा असे क्रमाक्रमाने व्यापक होत जाणारे सहकार्याचे वर्तुळ गृहीत धरलेले आहे.

१.४) कृतिसंशोधन निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. असे मानल्यामुळे कृतिसंशोधनात पडताळून पाहिलेली नवीन उपाययोजना अयशस्वी ठरल्यास अन्य पर्याय कोणते ? आणि ते नवे पर्याय पडताळून पाहण्याची योजना स्वीकारायाची संशोधकाची तयारी, सुस्पष्टपणे वेळोवेळी प्रतीत झाली पाहिजे. जर आपली उपाययोजना यशस्वी झाली तर ती अन्य परिस्थितीत किंवा व्यापक वर्तुळात तशीच यशस्वी होते का ? हेही पुढील कृतिसंशोधनातून तपासले पाहिजे.

२) कृतिसंशोधनाचा आराखडा-कृतिसंशोधनात आराखडा लवचीक असतो. प्रत्यक्ष कृती सुरू झाल्यानंतर गरज वाटल्यास आराखड्यात बदल करता येऊ शकतो. यामुळे या आराखड्यात काही मर्यादित बाबींचाच विचार करणे अपेक्षित आहे. त्यात **२.१)** कृतिसंशोधनविषयक प्रश्न कोणता ? **२.२)** तोच प्रश्न, तीच समस्या का निवडली ? **२.३)** सध्या काय परिस्थिती आहे ? **२.४)** त्या परिस्थितीला पुरेसे पुरावे अथवा आधार कोणते ? **२.५)** सदर परिस्थितीत बदल करण्यासाठी तुम्ही काय करणार आहात. **२.६)** आपण जी कृती केली त्याचा प्रभाव पडला का ? हे कसे ठरविणार ? **२.७)** त्याला आधार काय ? त्यांचे मूल्यमापन कसे करणार ? **२.८)** त्याची सप्रमाणता कशी आजमावणार ? **२.९)** सदर नवी कार्यपद्धती प्रभावी असेल तर आपल्या प्रचलित दैनंदिन व्यवहारात कोणत्या सुधारणा करणार ?

अशा काही प्रश्नांना धरून आराखडा लिहावा. त्यात गृहीतके, व्याप्ती, मर्यादा इत्यादींचा समावेश नसला तरी हरकत नाही. आराखडा तयार करण्यापूर्वी संदर्भ साहित्याचे वाचन केलेले संशोधनास पूरक व पोषक ठरते. मात्र कृतिसंशोधनात तसा आग्रह नाही. संशोधकाचा विमर्शी विचारच अधिक महत्त्वाचा मानला जातो.

३) कृतिसंशोधनाची कार्यवाही - कार्यवाहीत आपण सद्य:स्थितीचा शोध घेतो. त्यासाठी आवश्यक व उचित पुरावे गोळा करावे लागतात. त्यावर आधारित नवीन कृती योजना व तिचे परिणाम ह्यांचा शोध घेतला जातो. झालेला बदल हा आपल्या कृतीमुळे झाला याचे पुरावे, आधार सादर करावे लागतात. ही माहिती एकाच साधनाने आणि मर्यादित स्रोताकडून प्राप्त न करता अनेक साधने व स्रोतांकडून प्राप्त करणे आवश्यक मानले आहे. यालाच आपण त्रिकोणीकरण किंवा त्रिमीतीकरण (Triangulation) असे म्हणतात. ही माहिती गुणात्मक व संख्यात्मक असते.



४) कृतिसंशोधनात सामग्री विश्लेषण - कृतिसंशोधन हे विशिष्ट परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी केलेले असल्याने त्याच्या निष्कर्षाचे सामान्यीकरण करणे अभिप्रेत नाही. त्यामुळे अनुमान काढण्यास उपयुक्त ठरणारी सांख्यिकीय तंत्रे वापरण्याची गरज नाही. उदा t test, ANOVA इत्यादी तंत्रे वापरण्याची गरज नाही. फारतर वर्णनात्मक सांख्यिकीचा वापर करता येईल. उदा.मध्यमान, प्रमाणविचलन, शेकडेवारी, टक्केवारी, आलेख, इत्यादी ह्यांच्या मदतीनेही माहिती सादर केली तरी चालू शकते.

५) अहवाल लेखन - **५.१)** कृतिसंशोधनात अहवाल लेखन तृतीय पुरुषी एकवचनी करण्याची गरज नाही. त्याऐवजी मी असे केले, मला असे दिसून आले इत्यादी प्रथमपुरुषी एकवचनी भाषेत असावे. थोडक्यात अहवाल लेखनात मी हा केंद्रीभूत असावा. **५.२)** आपण ज्या विशिष्ट संदर्भात कृतिसंशोधन केलेले आहे. ती परिस्थिती सुस्पष्टपणे मांडली जावी. म्हणजे माझी शाळा ज्या खेड्यात, गावात, आहे तेथील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक परिस्थिती, शाळेचे स्वरूप आपल्या अध्ययनार्थीची पार्श्वभूमी इत्यादी सर्वांना अहवालात महत्त्व आहे. म्हणजेच ज्या परिस्थितीत संशोधन झाले त्या परिस्थितीची कल्पना येते. तशीच परिस्थिती अन्यत्र असेल तर ह्याच प्रकारचे कृतिसंशोधन इतर व्यक्तीही घेऊ शकतात.

५.३) अहवाल सादरीकरणात छायाचित्रे, विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष निर्मितीचे नमुने, अभिप्राय, कथने, भावभावनांची अभिव्यक्ती, अनौपचारिक संवाद, इत्यादींचा समावेश आवर्जून करावा.

५.४) अहवाल लेखनाची भाषा ही वाचनीय असावी. त्यात कविता, अलंकार, अवतरणे, सुविचार, चित्रे इत्यादींचा समावेश करावा.

५.५) कृतिसंशोधनाच्या अहवालात संशोधकाच्या विमर्शी चिंतनाचे प्रतिबिंब दिसले पाहिजे. ह्या संदर्भात त्यांनी काही वाचन केले असेल तर त्याचा जरूर समावेश करावा.त्याकरिता संबंधित साहित्याचा आढावा अशा स्वतंत्र प्रकरणाची गरज नाही. वाचन करू नये असेही अभिप्रेत नाही.परंतु आपली समस्या त्यावरील इतर संशोधने आणि संदर्भ साहित्यावरील विमर्शी चिंतनाला अधिक महत्त्व आहे.

५.६) आपल्याला प्राप्त झालेल्या निष्कर्षावर तज्ज्ञांचे अभिप्राय सादर करावेत. त्यांचे सोबत चर्चा करावी त्या चर्चेचा गोषवारा लिहावा. त्यात यश-अपयशावर आधारित विश्लेषण आणि पुढील कार्यानंदाची सुस्पष्ट दिशा अर्थात रोड मॅप देण्यात यावा.

समारोप :-

कृतिसंशोधनाचा नवा दृष्टिकोन हा प्रचलित संकल्पनेपेक्षा संपूर्णतः वेगळा आहे. त्याचा उचित समारोप करण्यात यावा. त्याकरिता आवश्यक ती सुभाषिते, कवितेच्या ओळी, सुविचार, वेचे इत्यादींचा वापर करावा. लेखन सलग कथेसारखे, कवितेसारखे, डायरी लेखनासारखे केले तरी चालेल.

संदर्भ - १) पाईकराव विजयकुमार (२००३ मार्च) (संपादक) दूरशिक्षणातील शिक्षक प्रशिक्षण प्रकरण विमर्शी अध्यापन, यचममुवि प्रकाशन, नाशिक. २) जोशी अनंत ह्यांचे सोबत चर्चा व मार्गदर्शन.